मु दि ३१ पान ४२ १५०४

# राजवाडा

या राजवाड्याने
सुबत्ता जागवली
सत्तेची मस्ती नागवली
न्याय-अन्याय डोळे भरुन पाहिला,
शौर्य पराक्रमाच्या कैफावर
धुळफेक केली
पराभवाची उद्विग्नतासुध्दां
सांदीपांदीत लपवली
आणि
ऐहिक सुखाचा प्रकाश गिळला
स्वतःच्या तेजस्वी दिमाखानं,
ऐश्वर्याच्या बळावर
अंधाराहि खरेदी केला
कित्येकांची दिलजमाई -
कित्येकांची पोटकमाई
याच राजवाड्याने बहाल केली
तेव्हा म्हणे
स्वर्गाचे रंग इथूनच उधळले जात होते